ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अपंग मुलांचे मूल्यमापन

श्री.जाधव रमाकांत श्रीहरी

*( M.A.,M.ed.,P.H.D.)* ***विद्या प्रतिष्टान शिक्षण शास्त्र , महाविद्यालय, अहमदनगर.***

***Scholarly Research Journal's** is licensed Based on a work at **www.srjis.com***

## प्रस्तावना

मूल्यमापन प्र क्रया हा संपूर्ण अध्ययन - अध्यापन प्र क्रयेचा एक अनिवार्य आ ण अ वभाज्य घटक आहे . या प्र क्रयेत सातत्य अ भप्रेत आहे . सतत शैक्ष णक कार्यक्रमाचे नियोजन करून त्याची पूर्तता वद्याथ्यामार्फत करायची आहे . या शैक्ष णक कार्यक्रमाद्वारे वद्याथ्याचा गुणात्मक बदल कती झाला , हे ठर वण्यासाठी निरनिराळ्या पद्धतीने मूल्यमापन करून सामान्य मुलांप्रमाणे अपंग मुलांच्या नोंदी शक्षकांनी ठेवाव्यात असे अ भप्रेत आहे . मात्र त्यात अपंगत्व प्रकारानुसार लव चकता असावी .

समावेशक शक्षण असलेले वद्यार्थी हे आता व वध प्रकारचे असतात . अपंगत्व प्रकारानुसार प्रत्येक अपंग मुलांची शैक्ष णक साधने , अध्यापन पद्धती , त्यांच्यासाठीच्या इतर सोयी -सवलती यात जसा थोडा -थोडा बदल आढळतो , तसाच बदल मूल्यमापन पध्दतीतहि आढळतो . या अपंग मुलांना सर्वसामान्य मुलांबरोबर घड वताना बरेच परिश्रम घ्यावे लागणार आहेत. त्यासाठी बरेच परिश्रम घ्यावे लागणार आहेत . त्यासाठी सर्व स्तरांवरून सहकार्य हि मळणार आहेच . अपंग मुलांचा वकस साधण्यासाठी आपण सर्व सामान्य मुलांच्याच पाठ्यपुस्तकांचा आधार घ्यावा लागणार . दैनंदिन अध्यापनातून मुलांमध्ये निश्चित परिवर्तन झालेले आहे कंवा नाही हे ठर वण्यासाठी मूल्यमापन आवश्यकआहे .सामान्य मुलांसाठी मुल्यामापणाच्या ज्या पद्धती आहेत प्रच लत आहेत त्याच पद्धतीचा वापर अपंग मुलांसाठी आवश्यक बदलासह करता येइल .

आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना सर्व प्रकारच्या अपंग मुलांनाही बरोबर न्यायचे आहे . कुणालाही मागे ठेवायचे नाही हे लक्षात ठेऊनच काम करायचे आहे . आजच्या काळात प्रत्येक क्षेत्रात मुल्यमापनाला महत्त्व आहे . प्रत्येक वेळी झालेल्या कामातील गुण -दोषांची दाखल घेऊन पुढील आखणी करणे , सोयीचे व्हावे ,या साठीही मूल्यमापन पद्धतीला महत्व आहे हे जाणून घ्यावे .

## उद्दिष्टे :-

१ अपंग मुलांच्या शक्षण प्र क्रयेतील मूल्यमापनाचे स्थान व महत्व शक्षांकानी समजून घेणे .

२ दृश्य स्वरूपातील शारीरिक वकासाबरोबर बौद् धक वकासाचीमाहिती शक्षकांनी घेणे .

३ अपंगत्वामुळे सर्वकष क्षमता वकासामध्ये प्रगती होण्यासाठी शक्षकांनी मूल्यमापन पद्धतीचा वापर करणे .

४ अपंग वध्यार्थ्याच्या दैनंदिन वर्तन -परिवर्तन सामान्य वद्यार्थ्यांप्रमाणे होण्याची शक्षकांनी दक्षता घेणे .

५ मूल्यमापन करताना गुणात्मक नोंदीच्या आधारे प्रगती पाहून अपंग वद्यार्थ्यास पुढील शैक्ष णक वर्षात प्रवेश देणे .

## संकल्पना -

शक्षण हि अव्याहत चालणारी प्र क्रया आहे . या प्रक्रीयेमध्ये पालक , शक्षक आ ण वद्यार्थी या मानवी घटकांचा समन्वय साधलेला असतो . प्राथ मक शक्षण सर्वांना सक्तीचे व मोफत करताना त्यात अपंग मुलांचाही समावेश करावयाचा आहे .शालेय शक्षणात अपंग आ ण सामान्य हा भेद न ठेवता सर्वांना समान शक्षण द्यायचे आहे . सर्व प्रकारच्या अपंग मुलांना सामान्य मुलांबरोबर शक्षण देत असताना सामान्य मुलांचाच अभ्यासक्रम राबवायचा आहे .त्याचप्रमाणे मूल्यमापन , मुल्यांकन व परीक्षा पद्धती शक्यतो तीच वापरायची आहे .फक्त त्यात थोडी लव चकता असणे आवश्यक आहे . प्रत्येक अपंग मुलाला कोणता भाग कती समजला हे जाणून घेण्यासाठी काही वेळा मुळ प्रश्नाला उपप्रश्न वचारावेत . तोंडी परीक्षा , लेखी परीक्षा , प्रात्य क्षक परीक्षा काही वेळा वैयक्तिकहि घ्याव्या लागतील . प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी वाचक आयोजित करावे लागतील कंवा प्रश्नपत्रिका मोठ्या अक्षरात लहून द्याव्या लागतील . कधी लेखनिकाचेही (writer) आयोजन करावे लागेल. तर कधी वेळहि जास्त द्यावा लागेल . कधी साहित्यात बदल करावा लागेल तर कधी प्रश्नपत्रिकेतही बदल करावा लागेल . अशा पद्धतीचा वापर करून मूल्यमापन व मुल्यांकन करावे लागणार आहे . प्रत्येक बालकाच्या वशेष गरजांच्या प्रकारानुसार स वस्तर मूल्यमापन करावे लागेल .

## वषयांश -

पाठ्यक्रमानुसार अभ्यासक्रम घेत असताना निरनिराळ्या क्षमताचा वकास होणे अपे क्षत आहे .यास क्षमाता धष्टीत अभ्यासक्रम असेही आपण म्हणतो . वद्यार्थ्याच्या कोणत्या क्षमताचा कसा वकास साधायचा याचे मार्गदर्शन ही पाठ्यपुस्तकात केलेले असते . त्यामुळे मूल्यमापन म्हणजे केवळ प्रश्नपात्रिका तयार करून ,लेखीपरीक्षा घेऊन , उत्तरपत्रिका तपासून व गुण देऊन वद्यार्थांना नापास

कवां पास करण्याची प्र क्रया नसून व वध क्षमतांचे वकसन सर्व वद्यार्थ्यांमध्ये झाले आहे की नाही हे व वध प्रकारे वेळोवेळी व पूर्णतःपडताळून पाहण्याची प्र क्रया आहे असे लक्षात ठेवावे .

वद्यार्थांचा सर्वांगीण वकास सुयोग्य दिशेने व अपे क्षत पातळीपर्यंत होण्यासाठी अध्ययनातील अडचणी अथवा अध्यापनातील त्रुटीचा शोध घेणे हे मूल्यमापन प्र क्रयेचे मुख्य कार्य आहे . वद्यार्थांच्या बौद् धक ,भावनिक आ ण क्रयात्मक अशा तीनही अंगाचे मूल्यमापन व्हायला हवे असे लक्षात घ्यावे .

## १ ) अंधांचे मूल्यमापन :-

सर्व शक्षण मोहिमें अंतर्गत सामान्य मुलांबरोबरच अंध मुलांना शक्षण देत असताना परीक्षा कशी घ्यावी ? इत्यादी बाबतचे मार्गदर्शन पुढीलप्रमाणे ---

अंध मुलांची सामान्य मुलाप्रमाणेच परीक्षा घ्यावी . त्यांना उत्तरपत्रिका लेखनात ब्रेन लपीचा वापर करता येतो . यासाठी सामान्य मुलांपेक्षा उत्तरपत्रिका लेखनासाठी थोडा अ धक वेळ द्यावा लागतो . तसेच अंशतः दृष्टी असणाऱ्या वद्यार्थ्यांना मोठ्या अक्षरात प्रश्नपत्रिका तयार करून द्यावी लागते .तोंडी व प्रात्य क्षक प्रश्न प्रकारांची उत्तरे अंध मुले सहज देऊ शकतात .( वज्ञानातील साहित्य वापरताना व रसायने वापरताना काळजी घ्यावी अथवा त्यांची माहिती तोंडी वचारावी .)

प्राथ मक स्थरावर सर्व वषयाची परीक्षा सामान्य मुलांप्रमाणेच असावी . माध्य मक शालांत परीक्षेसाठी लेखनिकाची व्यवस्था करता येते .हा लेखनिक मागच्या इयत्तेतील असावा . म्हणजे इ .१० वीच्या अंध वद्यार्थ्यासाठी इ .९ वी तील वद्यार्थी लेखनिक घेता येईल . इ १० वीच्या परीक्षेची पूर्व तयारी म्हणून इ . ८ वी पासूनच लेखनिकाची व्यवस्था करावी .

ग णत या वषयाची परीक्षा पाटी व खळे यांच्या साहाय्याने घ्यावी . एका वेळी एक उदाहरण सोड वण्यास सांगावे . त्याचे मुल्यांकन करून त्याची स्वतंत्र नोंद करावी . या पद्धतीने थोडा अ धक वेळ द्यावा लागतो . परंतु संपूर्ण प्रश्नपत्रिका सोड वता येते .

खेळ , कार्यानुभव , चत्रकला , मातीकाम या वषयातील अंध मुलांच्या मर्यादा ओळखून जेथपर्यंत त्यांना कृती करता येतील तेथपर्यंत सहभाग घेऊ द्यावा . संगीत वषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात असावा .

अभ्यासक्रमामध्ये काही वषयात सवलती दिल्या जातात त्याची शक्षकांनी माहिती करून घ्यावी .(उदा .आकृत्या , वज्ञान , भूगोल , ग णत इत्यादी बाबत )

अंशतः अंध वद्यार्थ्यांना मोठ्या अक्षरात प्रश्नपत्रिका तयार करून द्यावी .

सामान्य मुलांच्या निकषांप्रमाणे मुल्यांकन करता येते . वाचन , लेखन , पाठांतर , प्रत्यक्ष कृती करणे , ओळखणे , माहितीचा व्यवहारात उपयोग करणे इ . गोष्टींचा मूल्यमापनासाठी उपयोग करता

येईल .

## २ ) कर्णब धरांचे मूल्यमापन :-

कर्णब धर मुलांचे अपंगत्व चटकन ओळखता येत नसल्याने या मुलांना समाजात व शाळेत वावरताना , शक्षण घेत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते .

कर्णब धर मुलांच्यातही प्रत्येकाच्या श्रवणह्रासातबदल असतो . त्याचप्रमाणे त्यांना शक्षकाने मार्गदर्शन करावयाचे असते . म्हणून परीक्षा पद्धतीतही बदल आवश्यक असते .

भाषा वषयात व्याकरणाच्या चुका , वाक्यरचनेतील चुका याबाबत लवचीकतेचे धोरण ठेवावे .सामान्य मुलांसारख्या चुकांच्या नोंदी घेऊ नयेत . भाषेचे ज्ञान होणे आवश्यक आहे . अभ्यासक्रमातील तीन भाषांपैकी एका भाषेत उत्तीर्ण होणे आवश्यक असते .

लेखी परीक्षेच्या वेळी प्रश्नपारीकेतील प्रश्नांचा अर्थ न समजल्यास समजावून द्यावा . उत्तरात आशयाला प्राधान्य द्यावे . इतरांपेक्षा अर्धा तास जास्त द्यावा . मौ खक कंवा तोंडी परीक्षेचे वेळी तोंडी प्रश्न वचारण्यापेक्षा लेखी प्रश्नपत्रिका तयार ठेवावी . म्हणजे प्रश्न अचूक समजतो . अंशतः कर्णब धर वद्यार्थ्याला क वता कंवा उतारा म्हणण्यास सांगावे .उच्चारणाचे गुण कापू नयेत . तसेच तीव्र कर्णब धरत्व असलेल्या मुलांना त्याच क वता कंवा उतारा लहिण्यास सांगावे .

प्रात्य क्षक परीक्षेचे वेळीही प्रश्नपत्रिका तयार ठेवावी . म्हणजे भाषेची अडचण येणार नाही . या मुलांच्या खेळ , कार्यानुभव , चत्रकला या वषयाच्या परीक्षा घेताना अडचणी आल्यास त्यावेळी ओष्ट्वाचन , बोटांच्या खुणा इ . माध्यमांवर भर द्यावा .

## ३ ) मतिमंदाचे मूल्यमापन :-

मतीमंद मुलांचे शक्षण हे जीवन व्यवहार आ ण दैनंदिन गरजा भागवणारे असावे . तसेच मॉटेस शक्षण पद्धतीवर असावे . शारीरिक स्वच्छता त्यांना शकवावी लागते . त्यांना स्वतःहून खेळता येत नाही . खेळातील नियम त्यांना पटकन समजत नाहीत . यासाठी त्याच त्या खेळाचा सराव देऊन त्यांच्याशी खेळावे लागते . सामान्य मुलांच्या सहवासाने ह्या गोष्टी सहज साध्य करटा येतील . शक्षकांनी वर्गात टप्प्या -टप्प्याने वषयभाग सांगावा व य्ताचे परीक्षण करावे . प्रश्नप्रकार समजावून सांगावेत . यांच्या शक्षणाला मर्यादा आहेत . पण शाळा या माध्यमातून त्यांच्यात खूप प्रगती झालेली आढळते .इ.२ री , इ .३ री च्या अभ्यासक्रमापर्यंत या मुलांची प्रगती होऊ शकते .

काही वद्यार्थी भाषेत प्रगती करू शकतात , काही ग णतात . तसेच लेखन आले तर वाचन येते असे नाही कंवा वाचन आले तर लेखन येईलच असे नाही . म्हणून प्रत्येकाची शारीरिक क्षमता , बौद् धक कुवत , आकलन शक्ती , यात वाढ झाली कंवा नाही हे मूल्यमापन करताना लक्षात घ्यावे .

आधुनिक वस्तूंचा म्हणजे टे लफोन , मोबाईल , कॅल्क्युलेटर, कॉम्पुटर यांचाही वापर वद्यार्थी

सरावाने करू शकतात . अभ्यासात मागे राहिले तरी चत्रकला , गायन , नृत्य खेळ यात उत्तम प्रगती साध्य करू शकतात . परीक्षेच्या माध्यमातून या मुलांची सामाजिक , कौटुंबिक उपयुक्तता कशी वाढेल हे शक्षकांनी पाहावे .

मतिमंदत्वाच्या स्तरानुसार सौम्य (४० टे ७० ) या सीमा रेषेवरील (७० टे ९०) पर्यंतची मुले शाळेत प्राथ मक शक्षण घेऊ शकतात . म्हणून प्रत्येकाचा स्तर ओळखून त्यांची परीक्षा वैयक्तिक पद्धतीने घ्यावी . त्यास थोडा वेळ जास्त द्यावा . त्यांना येत असलेल्या गोष्टींचे कौतुक करून प्रोत्साहन द्यावे .

## ४) अस्थिव्यंग असणाऱ्यांचे मूल्यमापन :-

अस्थिव्यंग हि मुले सर्वसामान्य मुलांप्रमाणेच व्यवहार करू शकतात . फक्त त्यांच्या ज्या मर्यादा असतात , त्यावर मत करण्यासाठी त्यांना वशेष साधनांची आवश्यकता असते . त्या साधनाद्वारे हि मुले उत्तम व्यवहार करू शकतात . प्रत्येकाच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणी दूर केल्या गेल्या पाहिजेत . एवढेच लक्षात ठेवावे व सामान्यांबरोबर येण्यासाठी त्यांच्याप्रमाणेच अभ्यासक्रम , मूल्यमापन , मुल्यांकन व परीक्षा पद्धत ठेवावी .

## ५) मेंदूचा पक्षाघात असणाऱ्यांचे मूल्यमापन :-

या आजाराने अपंग झालेल्या प्रत्येक बालकाची कार्यक्षमता वेगळी असते . टी शोधून त्यांना अ धक कार्यक्षम करावे . अभ्यासक्रमानुसार कोणता वषय भाग शकवायचा टे ठरवून थोडी वेगळ्या प्रकारची प्रश्नपत्रिका तयार करावी .वैयक्तिक परीक्षा घ्यावी . उत्तरे मळ वण्यासाठी लेखी , तोंडी चत्रे इत्यादी मार्ग योजावेत . प्रसंगी लेखनिकाची व्यवस्था करावी या मुलांना प्रोत्साहनाची , कौतुकाची गरज असते . परीक्षा पध्दतीतून टे साध्य व्हावे . परीक्षेत फक्त संख्यात्मक गुण न देता गुणात्मक वाढ कशी झाली याचा आलेख अथवा शाब्दिक नोंदी ठेवाव्यात . शक्षकांच्या , पालकांच्या सहकार्याने हि मुले कॉम्पुटरसारख्या वषयातही प्रगती साधू शकतात , हेही लक्षात ठेवावे .

## ६ ) अध्ययन अक्षमता असणाऱ्यांचे मूल्यमापन:-

या प्रकारातील अपंग मुलांना अभ्यास शकण्यात बर्याच अडचणी येतात . त्यासाठी शक्षकांनी सतत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे . सराव करून घेणे हि अपे क्षत आहे .

या मुलांनी कती कौशल्ये आत्मसात केली याबाबत शक्षकांनी लक्ष ठेवावे . भा षक चुकांचे मूल्यमापन करू नये . ग णतातील प्रश्नांचे अर्थ समजावून सांगावेत . शक्य असेल तेव्हां लेखनिक द्यावा .त्यासाठी जास्त वेळ द्यावा . सोपे सोपे प्रश्न वचारावेत प्रत्येक मुलाची क्षमता ओळखून वषयानुरूप लव चकता ठेवावी , मुल्यांकन करावे .

## ७) स्वमग्नता असणाऱ्यांचे मूल्यमापन :-

मुलांच्या वाढीच्या वयात दिसणारी ही एक गुंतागुंतीची वैका सक समस्या आहे . स्वतःच्याच वश्वात सातत्याने रमणे म्हणजे स्वमग्नता . स्वमग्न मुलांचे माहिती पोहच वणारे मार्ग व इंद्रिये अति संवेदनशील असतात . मळालेल्या माहितीचे एकत्रीकरण करून त्यांचा अर्थ लावणे कंवा उपयोग करणे या मुलांना अवघड जाते . म्हणून अध्ययन अध्यापन प्र क्रयेतून ज्ञानेंद्रियांच्या गरजा मूल्यमापन करून ठरवाव्यात . निरनिराळ्या आवडीच्या उपक्रमांत बक्षीस देणार आधीच सांगावे .

शक्षकांनी आपल्या अध्यापनातील थोडा वेळ या मुलांना दिल्यास त्यांच्यात थोडी प्रगती दिसेल . वद्यार्थ्यांच्या गुणात्मक नोंदीचा तक्ता पाहून त्याप्रमाणे अपंग वद्यार्थ्यांच्या अनेक नोंदी करता येतील .

क्षमताधीष्टीत मूल्यमापन नोंदवही प्रमाणे आपण आपल्या शाळेतील सर्व सामान्य मुलांच्या गुणात्मक नोंदी करत आहात . त्याचप्रमाणे प्रत्येक अपंग मुलांच्या क्षमतांच्या गुणात्मक नोंदीही आपणास करावयाच्या आहेत . गुणात्मक नोंदी करताना फक्त प्रगतीच्या नोंदी न करता अपंग मुलांच्या अध्ययनातील समस्या कोणत्या ते समजावून घेऊन त्यावर केलेल्या उपयोजनांचा आढावा घ्यावा त्याची माहिती मुख्याध्यापक , सह शक्षक व पालक यांना वेळोवेळी द्यावी . अध्ययनात येणाऱ्या उणीवा , चुका यावर लक्ष कैंद्रित होऊन अपंग मुलांची गु णवत्ता सुधारण्यास मदतच होईल असे वाटते .

प्रत्येक अपंग मुलाच्या नोंदी ह्या वै शष्टपूर्ण असाव्यात . उदा . कोणत्याही वषयात कृती आवडते ,स्वस्थ बसणे अवघड जाते .सामान्य मुलांबरोबर खेळत नाही . इ . अशाप्रकारे नोंदी थोडक्यात पण अर्थपूर्ण असाव्यात .

कोणताही वषयभाग शकवीत असताना तो अपंग मुलांना येण्यासाठी त्यात सातत्याची आवश्यकता असते .या गोष्टीकडे लक्ष देऊन हे सातत्य कसे वाढवता येईल , याबाबत शक्षकांनी दक्ष असावे . सातत्य कती , केव्हापासून त्याच्या तारखेसह नोंदी कराव्यात .म्हणजे एखाद्या अपंग बालकास एखादा वषय , घटक समजण्यास कती कालावधी लागतो याचा शक्षकांना अंदाज येईल .त्यानुसार वर्षभराच्य अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन तो पूर्ण करणेही सोयीस्कर होईल.

प्रत्येक वषय घटकात वद्यार्थ्यांची प्रगती होते आहे ना ?योग्य गतीने प्रगती होते आहे का ? यासाठी गुणात्मक नोंदीचा फार मोठा उपयोग होतो . या नोंदी फाक्त उपचार म्हणून करू नयेत . पुढे प्राथ मक स्तरावर वषयानुरूप गुण नोंदी कशा करता येतील टे पाहू .

भाषा :-

१) दिलेल्या सूचना पाळतो .

२) गोष्टी / गाणी यातील क्रम लक्षात ठेवतो .

३) संवाद समजतो .

४) अ भनय समजून घेण्याचा प्रयत्न करतो .

५) निरोपाची देवाण -घेवाण करतो .

६) प्रश्नाची उत्तरे देतो .

७) निरनिराळे प्रश्न वचारतो .

८) शब्दोच्चार करण्यास अडखळतो .

ग णत :-अंकसंबोधन-वस्तूंचा वापर :-

१) वस्तू ओळखतो.

२) वस्तूची हाताळणी योग्य प्रकारे करतो

३) दिलेल्या वस्तू सांगतो

४) क्रमवार संख्या मोजतो .

५) मागचा पुढचा अंक समजतो

६) वस्तूंच्या संख्येनुसार लहान मोठा अंक ओळखतो .

७) संख्या उतरत्या क्रमाने म्हणताना अडखळतो.

८) काही नाही म्हणजे शून्य या संख्येचा वापर करतो

९) वस्तू कमी करताना अथवा मळवताना अवघड जाते.

१०) संख्याच दैनंदिन वापर कमी करतो

परिसर :-

१) सर्व व्यक्ती , वस्तू,प्राणी,ई.चा परिचय करून घेण्यास उत्सुक असतो.

२) स्वतःची दैनंदिन कामे सावकाश करतो.

३) स्वच्छता करण्यास मदत करतो.

४) मनोरंजनाची साधने वोलाखातो.

५) नाते संबंध समजतो.

६) ऋतुमानाप्रमाणे कपड्यातील बदल समजतो.

या खेरीज वर्गात शस्त पाळतो,पाठांतर सहज करतो, वचार्लेलेया प्रश्नाची अचूक उत्तरे सर्वात
आधी सांगतो.वर्गातील इतर मुलांना मदत करतो . दिलेल्या कृत्रिम साधनांचा वापर करतो.इ गुंनांची नोंद शक्षकांनी सर्व सामान्य मुलाबरोबर अपंग मुल्लांचीही करावी.

अपंग मुले आपल्या मर्यादावर मात करून चत्रे काढणे ,मातीकाम करणे,पोहणे, संगीतात गायन वादन करणे,न्रीत्या करणे, यात पारंगत होऊ शकतात याचेही भान शक्षकांनी ठेवावे.

## अपंगांचे मूल्यमापन करताना -

* मूल्यमापन पद्धती अडसर ठरता कामा नये.
* मुलांच्या आत्मसन्मानाला धक्का लागता कामा नये.
* अपंग मुलाना इतरासामोर कमी लेखू नये .
* अपंग मुलांची मर्यादा लक्षात घेवून त्यावर उपाय योजन करावी .
* शक्षकांनी सहनशील मनोव्रीत्ती ठेवावी.
* शक्षकांनी वद्यार्थ्याकडून उत्तरे काढून घेण्याचा प्रयत्न करावा.
* प्रश्नांची भाषा सोपी असावी.त्यासाठी प्रश्नांना उपप्रश्ने वचारावीत.

## मूल्यमापन

१) अंध मुलांच्या परीक्षा घेताना लक्षात ठेवायाच्या तीन बाबी सांगा.

२) अस्थिव्यंग बालकाचे मूल्यमापन करताना कोणत्या तीन मर्यादा लक्षात घ्याल .

३) मतीमंद मुलांच्या परीक्षा घेताना कोणत्या तीन पद्धती अवलंब कराल.

४) कर्णब धर वध्यार्थ्यांच्या गुणात्मक नोंदी कशा ठेवाल.